आतल्या पानात..
अग्रलेख
अब की बार फडणवीस सरकार..

वृत्त वेध

लोकशाहीच्याबळकटीकरणासाठी...

पुणे बुधवार, १० ऑक्टोबर २०१८ * खंड: १६ * अंक: चौथा * पाने: ०२

पुणे शहर

पेट्रोल:८७.६१ रु.
डिझेल: ७६.६० रु.

थोडक्यात

मांजा अडकून डॉक्टर तरुणीचा मृत्यु

पुणे दि ८: आज सकाळी मोटार सायकलवरून भोसरीकडे जात असताना कासारवाडी येथील उड्डाणपूलावर मांजा गळ्यात अडकून डॉ. कृपाली निकम (वय२६) यांचा यात मृत्यू झाला. यापूर्वी ही पुणे शहर व परिसरात मांजामुळ अनेकांनी आपले प्राण गमवावे लागले.

कर्वे संस्थेतर्फे पीडितांचे सर्वेक्षण

कर्वे समाज सेवा संस्थेच्या विद्यार्थ्यांनीकेलादांडेकरपूलपरिसरातीलपुणे: शहरातील दांडेकर पुलानजीककॅनोल फुटल्यामुळे वाहुन गेलेल्या झोपड्या वत्यामुळे निर्माण झालेली परिस्थितीयांचा अभ्यास करण्यासाठी समाजकार्य शिक्षण घेत असलेल्याविद्यार्थ्यांनी एक अभ्यासाचा भाग म्हणून प्रत्यक्ष भेट देवुन एक सर्वे केला आहे. यामध्ये झालेले नुकसान नेमके काय होते त्यांचे स्वरूप काय होत हे लवकरच मांडणार आहेत.

राज्यभर प्राध्यापकांचे आंदोलन सुरु

पुणे – राज्यभर प्राध्यापकांनी काम बंद अदोलना पुकारले आहेत.येण परीक्षा काळात पुकारलेल्या आंदोलनामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होत आहे. रिक्त जागा त्वरित भराव्या, जुनी पेन्शन योजना लागू करावी यांच्यासह विविध मागण्यांसाठी राज्यभरात प्राध्यापकांचे कामबंद आंदोलन सुरु आहे.आज आंदोलनाचा१६ वा दिवस आहे तरीही सरकार कुठल्याही चर्चेस तयार नाही.

चिमटा सुमित सोनवणे

कल चाचणी

भाजप-शिवसेनेच्या चार वर्षांच्या कार्यकाळावर आपण समाधानी आहात का.



कमवा आणि शिका योजने पासून विद्यार्थी वंचित

कमवा आणि शिका योजनेचा लाभ मिळावा यासाठी विद्यापीठातील विद्यार्थ्यांचे उपोषण

सम्राट कदम

पुणे, दि १० ऑक्टोंबर.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील पदविकेच्या आणि तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांना ङ्गकमवा आणि शिकाफ्या योजनेसाठी विद्यार्थी कल्याण मंडळाने प्रवेश नाकारला.

या योजनेत गरजू विद्यार्थ्यांना प्रवेश मिळवा यासाठी विद्यार्थ्यांनी प्रशासनाला विनंती केली होती. पण या विनंतीची कोणतीही दखल नघेतल्यामुळे सोमवार दिनांक ८ ऑक्टोंबर रोजी चार विद्यार्थी उपोषणाला बसले आहे.

विद्यापीठात प्रवेश घेतलेल्या प्रत्येक विद्यार्थ्याला योजनेत प्रवेश देण्यात यावा,मागेल त्याला काम मिळावे,विद्यार्थी कल्याण मंडळाला पूर्णवेळ संचालक आणि प्रत्येक विद्यार्थ्याला जयकर ग्रंथालयाचे ओळखपत्र मिळावे या व इतर मागण्यांसाठी विकास खंडागळे,प्रताप हरकळ, विजय तळेगावकर आणि हनुमंत कुसंगे हे विद्यार्थी जयकर ग्रंथालायासमोर उपोषणाला बसले आहे.

उपोषणाच्या दुसऱ्या दिवशी विद्यार्थी कल्याण मंडळाचे संचालक प्रा. डॉ. प्रभाकर देसाई सर यांनी उपोषण कर्त्या विद्यार्थ्यांची भेट घेऊन त्वरित समाधान काढण्याचे आश्वासन दिले आहे. परंतू जो पर्यंत संपूर्ण निर्णय होत नाही तो पर्यंत उपोषण सोडणार नसल्याचा दावा विद्यार्थ्यांनी केला.

विद्यापीठात प्रवेश घेतलेल्या बऱ्याच विद्यार्थ्यांना कमवा व शिका या योजनेला प्रवेश दिला नाही.तरी विद्यापीठात खेड्यातून आलेल्या सर्वसामान्य कुटुंबातील गरीब शिकतात विद्यापीठ प्रशासनाने या गोष्टीचा कुठल्याच प्रकारे विचार केलेला नाही. म्हणून विद्यापीठातील विद्यार्थ्यांवर उपोषणाची वेळ आली आहे, असे प्रतिपादन विकास खंडागळे या विद्यार्थ्याने केले.

विद्यापीठात उपोषण करणारे विकास खंडागळे, प्रताप हरकळ, विजय तळेगावकर आणि हनुमंत कुसंगे हे विद्यार्थी. (छायाचित्र- सुमित सोनवणे)

भिलाई पोलाद प्रकल्पात स्फोट

पीटीआय, रायपूर
(१० ऑक्टोबर)

छत्तीसगडच्या भिलाई पोलाद प्रकल्पात स्फोट झाला असून जखमी व्यक्तींना ताबडतोब जवळच्या दवाखान्यात हलवण्यात आले. प्रकल्पातील गॅसपाईपलाईनचे काम सुरु असताना स्फोट झाला. स्फोटामुळे सर्वत्र धूर ववायूगळतीझाल्यामुळे बचावकार्यासाठी पोलिसांना अनेक अडचणींचा सामना करावा लागला. सकाळी साडे अकराच्या सुमारास हि दुर्घटना घडली. स्फोट झाल्यानंतर पोलीस

घटना स्थळी पोहोचले. भिलई पोलाद प्रकल्प सेल अंतर्गत चलावला जातो. हा प्रकल्प रायपूरपासून ३० किलोमीटर अंतरावर आहे. स्फोटाची तीव्रता जास्त असल्याने अनेक जण त्या दाबाने बाजूला उडून पडले. प्रकल्पाच्या परिसरात अनागोंदी माजली होती. पोलीस महानिरीक्षक जी. पी. सिंगम्हणाले की, मृतांची संख्या किमान ६ आहे व १४ लोक गंभीर जखमी आहेत.

राफेल करार सर्वोच्च न्यायालयात

पीटीआय, दिल्ली

(१० ऑक्टोबर) सरन्यायाधीश रंजन गोगोई यांच्या अध्यक्षतेखालीबसलेल्या खंडपीठानेराफेल कराराबाबत जनहित

याचिकांची सुनावणी सुरु केली आहे. यामध्ये३६ राफेल लढाऊ विमान खरेदीच्या करारातील निर्णय प्रक्रियेचा तपशील सर्वोच्च न्यायालयात सादर करण्यासकेंद्र सरकारला सांगण्यात आले आहे. आम्ही कोणतीही नोटीस केंद्र सरकारला बजावली नाही, पण आम्हीनिर्णय प्रक्रियेचा तपशील मागवत आहोत असे खंडपीठाने नमूद केले.दास सौल्ट एव्हिएशन कंत्राट संबंधित निर्णय प्रक्रियेचा तपशील मागितलाआहे. राफेल विमानाच्या किमतीबाबत अथवा अनुकूलतेबाबत कोणताही तपशील मागवलेला नाही.

राजकीय हेतू असल्याने हि याचिका दाखल केली गेली त्यामुळे तिला निकालात काढण्यात यावे अशी बाजू महाधिवक्ता वेणुगोपाल यांनी केंद्र सरकारच्या बाजूने मांडली. आम आदमी पक्षाचे राज्यसभा सदस्य संजय सिंग यांनी जनहित याचिका दाखल केली आहे. याचिकेच्या माध्यमातून या कराराची चौकशी सर्वोच्च न्यायालयाच्या देखरेखी खाली विशेष तपास पथकाने करावी अशी मागणी केली आहे.

पेन इंटरनॅशनल भाषावारी पुण्यात

संदीप आखाडे

महात्मा गांधीच्या १५० व्या जयंती निमित्त पेन इंटरनॅशनल काँगेसच्या आयोजनाचामान पहिल्यांदाभारतालामिळाला. पेन इंटरनॅशनल काँगेसच्या माध्यमातून जगातील लेखक याव्यासपीठावर एकत्र येतातव त्यांच्या कामाबद्दल व हक्कांबद्दल चर्चा करतात. पुण्यात याचे आयोजन गणेश देवी यांच्या दक्षिणायन या संस्थेच्यावतीने करण्यात आले होते. या संमेलनाचा भाग म्हणूनङ्घभाषावारीफ यारॅलीचे आयोजन करण्यात आलेहोते. यारॅलीचामार्गक्रम सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ ते शिवाजी पुतळा असा होता.

या भाषावारीचा उद्देश्य विविध भाषांचे जतन व सर्वभाष्यांचा आदर करण्याचासंदेश लोकांपर्यंत पोहचवण्याचा होता. या भाषावारीमध्ये ६ हजार आंतरराष्ट्रीय भाषांचा उल्लेख करण्यात आला होता.

या भाषावारीमध्ये १२७ देशातील प्रतिनिधी सहभागी झाले होते. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर, पेन इंटरनॅशनल काँग्रेसचे संचालक डॉ. कार्ल्स टोर्नर, भाषातज्ज्ञ डॉ. गणेश देवी यावेळी उपस्थित होते. भाषावारीमध्ये विद्यार्थ्यांसोबत मोठ्या प्रमणावर वारकरी सहभागी झाले होते. जगभरातील सहाहजार भाषांचे ओळख असणारे फलक महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या हाती भाषावारीत होते.

जाती-धर्मा पल्याडचे प्रेम...

काही प्रेमविवाह तामिळनाडूमध्ये परिवाराची प्रतिष्ठा व जातीय अहंकारातून आंतरजातीय विवाह करणाऱ्या प्रणयची निर्घृणपणे हत्या करण्यात आली. एका दलित मुलाने तथाकथित उच्च जातीच्या मुलीशी विवाहकेला म्हणून मुलीच्या वडिलांनी प्रणयला मारण्यासाठी सुपारी दिली.

आंतरजातीय विवाह केल्याने प्रणय व अमृताला स्वतःच्या कुटुंबाशी संघर्ष करून हिंसेला सामोरे जावे लागले मात्र, काहीदाम्पत्य अशी देखील आहेत ज्यांच्या आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाहाला कुटुंबातून संपूर्ण सहकार्य मिळाले.

सायली व जिंजुमन या दोघांचेही लग्न सुमारे दीड वर्षांपूर्वी झाले. सायली महाराष्ट्रातील सीकेपी तर जिंजुमन केरळच्या इरवा जा-

तीतील तरुण. या दोघांना एकत्र आणणारा धागा म्हणजे गाणे , खेळआणि राज्यशास्त्र या विषयाची आवड. मला सायलीतील साधेपणा, प्रामाणिकपणा आवडला असं जिंजुमन म्हणतो, तर मी जिंजुमन वर प्रेम करताना अथवा लग्नाचा निर्णय घेताना देखीलत्याच्या जातीचा, अथवा तो केरळचा आहे असा विचार माझ्या मनाला स्पर्श देखील झाला नाही असे सायली सांगते. दोघांनी लग्न करण्याचा निर्णय घेतला तेव्हा सायलीचे वडील हेतिच्याबाजुने

ठामपणे उभे राहिले.

सायलीचे वडील हे पारंपारिक विचारांचे होते तरीही मुलगा प्रामाणिक असेल, मेहनती असेल तर त्याची जात, रंग अथवा प्रदेश ते पाहणार नाहीत असा विश्वासत्यांनी सायलीला दिला व वडिलांनी संपूर्ण परिवाराची समजूत काढली.

या उलट जिंजुमनच्या घरी घडले, त्याच्या आई व वडिलांना कोणत्याही जातीची किंवा धर्माची मुलगी चालणार होती मात्र,मल्याळी मुलगीच सून म्हणून हवी होती. जातीच्या, प्रादेशिक अस्मितांच्या भिंती बाजूला सारून हे कुटुंब एकत्र आले आणि सायली व जिंजुमनचे लग्न ठरले.

या लग्नासाठी दोन्ही कुटुंबांकडूनएकच अट घालण्यात आली की, मुलीचा परिवार हुंडा देणार नाही व मुलाचा परिवार हुंडा स्वीकारणार नाही.

आटपाडी सारख्या छोट्या गावातून आलेली आरजू तांबोळी व पुण्याच्या विशाल विमल या दोघांनी आंतरधर्मीय विवाह केला. परिवर्तनवादी चळवळीशी दोघांचीही नाळ घट्ट जोडलीगेलेली असल्याने वैचारिक बैठक पक्की होती व मैत्रीचे रुपांतर प्रेमात झाले. विशालने स्वतःसोबत घरच्यांचे विचार काळाप्रमाणे बदलायला हवे यासाठी तो त्याच्या कुटुंबाशी संवाद साधत असेयामुळे जातीबद्दल असणारी कट्टरता विशालच्या घरात नव्हती. दोघांनी स्वतःच्या लग्नाबद्दल जेव्हा घरी सांगितले तेव्हा कसलाही विरोध न करता कुटुंबीय

सायली व जिंजुमन

लग्नासाठी तयार झाले.

आंतरधर्मीयविवाह असल्याने समाजाकडून विरोध झाला पण दोन्ही कुटुंब आरजू व विशालच्या बाजूने ठामपणे उभे राहिले. प्रणयवर झालेल्या हिंसेबद्दल विशाल म्हणतो, समाजात समानतेचा व जातीअंताचाविचारपोहचवला जात नाही म्हणून अशा घटना. कुटुंबाशी संवाद साधने अधिक महत्वाचे ठरते

निलेश आणि कोमल दोघेही उच्चशिक्षित व या दोघांचा आंतरजातीय विवाह आठ महिन्यांपूर्वी पार पडला. मृणाल हि एका मोकळ्या वातावरणात वाढलेली मुलगी. दोघांची आठवर्षांपूर्वीची ओळख.

एकमेकांचे विचार जुळतात, आपला जोडीदार आपल्याला कायम सन्मानाची वागणूक देईल या विश्वासातून लग्न करण्याचा निर्णय दोघांनी घेतला. निलेशने मृणालच्याघरच्यांसमोर लग्नाचा प्रस्ताव ठेवला तेव्हा मृणालच्या घरच्यांनी विरोध केला नाही मात्र, समाज काय म्हणेल? याची भीती त्यांना होती. मृणालच्या घरच्यांनी या प्रस्तावाबद्दल होकार कळवायलादीड वर्ष घेतला.

(कल्याणी माणगांवे, संदीप आखाडे सम्राट कदम)

अब की बार फडणवीस सरकार?

२०१९ ला पुन्हा मीच मुख्यमंत्री होणार असे आत्मविश्वासाने बोलणारे मुख्यमंत्री उसवलेला महाराष्ट्र एकसंघ करू शक्तीला का?

चला घेऊ शिव छत्रपतींचा आशीर्वाद, देऊ मोदींना साथ अशी घोषणा देत भाजपने महाराष्ट्रात सरकार स्थापन केले मात्र, फडणवीस हे कदाचित विसरले असतील कि, शिवरायाचे स्वराज्य अठरा पगड जातींचे होते. या सर्व जाती फडणवीस यांच्या राज्यात देखील आहेत पण फरक येतो तो एवढाच की, स्वराज्यात प्रत्येक घटकाला न्याय मिळाला पाहिजे यासाठी शिवरायांनी कायम प्रयत्न केले जे फडणवीस यांनी केलेले दिसत नाहीत.

कोणत्याही राज्य सरकारची जबाबदारी हि फक्त जनतेला पायाभूत सुविधा उपलब्ध करून देणे एवढीच नसते तर सामाजिक व जातीय सलोखा देखील अखंड ठेवणे महत्वाचे असते. मराठा, धनगर, मुस्लीम, दलित हे समाज आज अस्वस्थ आहेत.

मराठा आरक्षणाला सरकार कटिबद्ध असल्यास मराठा समाजाला अजून आरक्षण का मिळाले नाही?

याचे स्पष्टीकरण सरकारला देता आलेले नाही. एक वर्षानंतर जेव्हा मराठा समाज पुन्हा बंदची हाक देतो तेव्हा सरकारला अचानक जाग येते व योजनांचा भडीमार या समाजाला शांत करण्यासाठी केला जातो.

फडणवीस यांनी पहिल्या कॅबिनेटमध्ये धनगर समाजाला अनुसूचित जमाती अंतर्गत आरक्षण देऊ हा शब्द दिलेला होता. लोकशाहीत जनतेला दिलेला शब्द न पाळण्याचे मूल्य काय असते हे निवडणुकीच्या निकालानंतर तरी किमान तुम्हाला समजेल अशी अपेक्षा व्यक्त ज्ञर्रीर. या पार्श्वभूमीवर नाराज झालेल्या धनगर समाजाला पुन्हा २०१९ मध्ये भाजपकडे आकर्षित करण्याची जबाबदारी हि देखील देवेंद्र फडणवीस यांचीच असेल हे कदाचित त्यांनी स्वीकारलेले दिसते. या उलट मुस्लीम समाज भाजपला कधीही एक गठ्ठा मतदान करेल याची निश्चिती नसल्याने मुंबई उच्च न्यायालयाने मुस्लीम आरक्षणाला हिरवा कंदील दाखवून देखील सरकार दरबारी निष्क्रियता आहे.

या सर्व समाजाच्या असंतोषाचे कारण त्यांचे वाढते आर्थिक दारिद्र्य आहे हे या सरकारने समजून घ्यायला हवे. बहुसंख्यांक सामाजाचे उत्पन्न हे शेती व्यवसायातून येणारे होते मात्र, कोणताही आर्थिक स्त्रोत उरला नसल्याने मुलांना चांगल्या दर्जाचे शिक्षण देता येत नाही, सरकारी नोकरी हाच पर्याय या कुटुंबातील मुलांसमोर असतो.

वित्त आयोगाच्या अहवालानुसार राज्याचे कर संकलन घटले आहे. फडणवीस यांना पुन्हा मुख्यमंत्री व्हायचे असल्यास राज्याची आर्थिक घडी बसवणे हे सर्वात मोठे आव्हान त्यांच्यासमोर राहणार आहे.

पक्ष नेतृत्व आपल्या कामावर समाधानी असले तरीही देवेंद्र फडणवीस यांचे मूल्यमापन हि जनता करणार आहे याची नोंद घेणे आवश्यक आहे. जातीजातींमध्ये वाढलेली द्वेषाची भावना दूर

लोकशाहीतील मिरासदारी

कल्याणी माणगांवे

लोकशाहीतील सर्वोच्च सभागृहांमध्ये बहुसंख्य प्रतिनिधी हे पुरुष असतात, पण भारतीय लोकशाही हि कोणाची मिरासदारी नाही हे समजून घेऊन महिला प्रतीनिधीनींचा राजकारणातील सहभाग वाढणे गरजेचे आहे.

प्रत्येक व्यक्तीला देशाच्या संविधानाने जात, धर्म, लिंग, पंथ अशा कोणत्याही आधारावर विभागलेले नाही. समाजातील सर्व घटकांची प्रगतीची झाली पाहिजे, कोणताही व्यक्ती न्यायापासून वंचित राहू नये, हे ध्येय डोळ्यासमोर ठेवून डॉ. आंबेडकरांनी संविधान लिहिले व हे संविधान कोणत्याही देवाप्रती अथवा व्यक्तीप्रती समर्पित न करता या देशाच्या जनतेप्रती अर्पण केले. 'स्त्री-पुरुष समान आहेत' हे संवैधानिक मूल्य आपल्या देशाच्या पायाभरणीचा भाग बनले. याचा परिणाम असा झाला की, माझ्यासारख्या असंख्य महिला ज्यांना या समाजात स्थान नव्हते, अस्तित्व नव्हते त्यांना आत्मसन्मानाने जगण्याची ताकद संविधानाने दिली.

इतका समृद्ध इतिहास आपल्या देशाला लाभलेला असताना राजकारणासारख्या क्षेत्रात स्त्रियांचा सहभाग हा अत्यल्प दिसतो हे वास्तव आपल्याला नाकारता येणार नाही. देशातील आर्धी लोकसंख्या ही निर्णय घेण्याच्या मुख्य प्रवाहातून बाहेर आहे. महाराष्ट्राच्या विधानसभेत २८८ आमदारांपैकी फक्त २० महिला आमदार आहेत. याचे कारण म्हणजे राजकारण हे क्षेत्र मुळात स्त्रियांचे नाही असे बिरूद समाजात रुजलेले आहे.

या सगळ्याला अनेक बाबी कारणीभूत आहेत. प्रत्येक सरकारमध्ये महिला मंत्री या दोनच असतात त्यात देखील महिला व बालविकास खात्या व्यक्तिरिक्त इतर कोणतेही खाते त्यांना दिले जात नाही. हे एवढ्यापुरते सीमित नसून सभागृहात महिलांचे प्रश्न हे महिलांनी मांडावे असाही अट्टाहास आपल्याला पाहायला मिळतो. महिलांचे प्रश्न हे संपूर्ण समजाचे प्रश्न नसतात का? असा सवाल महिलांनी विचारायला हवा. अनेकदा महिला आमदार अतिशय महत्वाच्या मुद्द्यावर सरकारचे लक्ष सभागृहात वेधतात मात्र, वर्तमानपत्रे या महिला आमदारांची दखल घेताना दिसत नाही.

महिला आमदारांची बाईट घेण्यासाठीची गर्दी हि फक्त आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त झालेली दिसते. यासाठी राजकीय पक्षांच्या केंद्रस्थानी महिला यायला हव्यात. मंत्रिमंडळासोबत राजकीय पक्षात देखील महिलांना महत्वाची पदे द्यायला हवी. बऱ्याचदा महिला नेतृत्वावर असलेला अविश्वास यातून प्रतिबिंबित होत असतो हे आपण लक्षात घ्यायला पाहिजे. राजकीय पक्षांनी कर्तृत्वान महिलांना निवडणुकीची उमेदवारी दिल्यास हे प्रमाण वाढू शकेल.

महिला नेतृत्वाबद्दल असलेले नकारात्मक मत बदलायचे असल्यास याची सुरुवात महिलांनी राजकारणात सक्रीय होऊन करायला हवी. अगदी स्वतःची राजकीय मते बनवून आपण मतदान कोणाला करायचे याचा निर्णय स्वतःच्या सद्सद्विवेक बुद्धीने करायला हवा, हा देखील सक्रीय राजकीय सहभाग आहे. राजकारण हे क्षेत्र हे एका वर्गासाठी सीमित नसून लोकशाहीतील प्रत्येक व्यक्तीला यामध्ये सहभागी होण्याचा अधिकार आहे हे आपण समजून घेतले पाहिजे तरच भारतीय

ब्रम्हांडीय संशोधनासाठी जी.एम.आर.टी

जगातील सर्वात मोठ्या रेडियो दुर्बिणीच्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी पथदर्शक संस्था म्हणून पुण्याच्या जी.एम.आर.टी. ची अधिकृत घोषणा नुकतीच करण्यात आली. या आधी या प्रकल्पात निनुफार, लोफर, द विला या जागतिक दुर्बिणींचा समावेश होता.

अवकाश संशोधनात अग्रेसर असलेले प्रमुख दहा देश मिळून या शतकातील महत्वपूर्ण अवकाश संशोधन प्रकल्प चौरस किलोमीटर मालिका (स्क्वेअर किलोमीटर ऐरे) राबवत आहे. २०२४ मध्ये पूर्ण होणाऱ्या पहिल्या टप्प्यासाठी भारताच्या राष्ट्रीय खगोलभौतिकी केंद्राची (एन.सी.आर.ए.) महत्वाची भूमिका असेल. एन.सी.आर.ए. संचलित करत असलेल्या जी.एम.आर.टी. ची दुर्बीण चोवीस किलोमीटर व्यासाची असून यामध्ये तीस संग्राहक आहेत. यामुळे अवकाशातील तीस हजार मीटरवर्गातील भागाचे निरीक्षण करता येते. तसेच दुर्बिणीची वारांवारीता १५० मेगाहर्ट्झ ते १.५ गिगाहर्ट्झ असल्यामुळे या दुर्बिणीची निवड केल्याचे एस.के.ए. च्या परिपत्रकात म्हटले आहे.

एस.के.ए. साठी मार्गदर्शक संस्था म्हणून जी.एम.आर.टी. ची निवड होणे ही नक्कीच अभिमानाची गोष्ट आहे आणि या महत्वाकांक्षी प्रकल्पासाठी आम्ही भारतातर्फे महत्वपूर्ण सहभाग नोंदवू. भविष्याच्या दृष्टीने तांत्रिक व वैज्ञानिक दृष्ट्या भव्य असलेल्या या प्रकल्पात आम्ही मोलाचे योगदान देऊ. एन.सी.आर.ए. चे वरिष्ठ शास्त्रज्ञ प्रा. यशवंत गुप्ता म्हणाले.

जी.एम.आर.टी. मध्ये सध्या अत्याधुनिक बदल करण्यात येत आहे. त्यामुळे एन.सी.आर.ए. अवकाश संशोधनात जगाचे प्रतिनिधित्व करेल अशी शक्यता वर्तवली

भीमा पाटस सभा

भीमा सहकारी साखर कारखाना, पाटस (ता. दौंड) ची ३६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा आज पार पडली. कारखान्याचे अध्यक्ष राहुल कुल यांनी कारखान्याचा गळीत हंगाम सुरू करण्यासाठी तोडणी, वाहतूक यंत्रणा सज्ज असुन यंदा १० लाख टनापेक्षा जास्त ऊस गाळपाचे उद्दिष्ट असल्याचे सांगितले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष कारखान्याचे चेअरमन आमदार राहुल कुल यांनी प्रास्ताविक भाषण केल्यानंतर सभेला सुरुवात झाली. राहुलदादा कुल यांनी हा गळीत हंगाम कारखान्याची अर्थव्यवस्था बदलणारा ठरेल असे सांगितले.

.

या वार्षिक सर्वसाधारण सभेत सभासदांनी कारखाना अजुन पुर्वपदावर आला नाही, काटा पेमेंटचे काय झाले? तसेच कारखान्याच्या साखरेचा लिलाव करण्याची वेळ सरकारवर का आली?या संबंधी अरविंद गायकवाड, तानाजी दिवेकर, यांसह सभासदांनी उपस्थित उपस्थित केले होते.

या संदर्भात बोलताना कुल यांनी सांगितले की, तहसीलदारांनी जरी साखर विकली तरी

सृजन क्रिकेट करंडकमध्ये आता मुलीही खेळणार

सुमित सोनवणे

जिल्हा परिषद सदस्य रोहित पवार यांनी जिल्हा परिषद शाळांचे मार्केटिंग व युवा खेळाडूंच्या गुणकौशल्य विकासासाठी सुरू केलेल्या सृजन क्रिकेट स्पर्धेचे चौथे पर्व येत्या ३० ऑक्टोबर पासून संपर्णपुणे जिल्ह्यात सुरू होणार आहे. या स्पर्धेत मुलींचा देखील समावेश असणार आहे. ही स्पर्धा पुणे शहारापुरती मर्यादित न ठेवता जिल्ह्यातील चौदा तालुक्यांत आणि पिंपरी चिंचवड शहरात खेळवली जाणार आहे.

स्पर्धेचे आयोजन ३० ऑक्टोबर ते १६ डिसेंबर दरम्यान होणार आहे. ही स्पर्धा विनामुल्य असून देशातील टेनिस बॉलसोबत खेळली जाणारी ही सर्वात मोठी स्पर्धा आहे.

सृजन मध्ये लिंगाळी संघाचे सहभागी खेळाडू

या स्पर्धेत ५०० पेक्षा

जास्त संघ आणि ७५०० खेळाडूंचा समावेश असणार आहे. या स्पर्धेत पंचायत समिती गणातून किमान ३ व कमाल ६ संघांना सहभागाची संधी मिळणार आहे. पुणे किंवा तालुका ठिकाणच्या शहरी भागात १ ते ४ प्रभागाचा मिळून १ पंचायत समिती गण समजून त्याप्रमाणे ३ ते ६ संघाचा समावेश करण्यात येईल. एका संघात १५ खेळाडूंचा समावेश करता येईल. अर्थात प्रत्येक खेळाडूला आधी वैयक्तिक नोंदणी,नंतर संघाची नोंदणी करावी लागणार आहे.

जिल्हा परिषद सदस्य रोहित पवार यांनी या स्पर्धेची माहिती देताना असे प्रतिपादन केले की, सृजन क्रिकेट स्पर्धा ही ग्रामीण आणि शहर

भागातील तरुण खेळाडूंना राष्ट्रीय पातळीवर घेऊन जाण्यासाठी आयोजित करण्यात येते. यावर्षीपासून या स्पर्धेत मुलींना देखील संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे.

कोपनहेगन: वैज्ञानिक भेटीची अनिश्चितता

सम्राट कदम

पुंज्यभौतिकशास्त्राचे जनक नील्स बोर आणि अनिश्चिततेच्या सिधान्ताचे उद्गाते व जर्मनीच्या अणुविज्ञान विभागाचे तत्कालीन प्रमुख वर्नर हायजनबर्ग यांच्यामध्ये झालेल्या सुप्रसिद्ध भेटीवर आधारलेल हे नाटक आहे.

दुसऱ्या महायुद्धाच्या पार्श्वभूमीवर हे नाटक सुरु होते. जर्मनीने पादाक्रांत केलेल्या कोपनहेगन या शहरात मध्ये वर्नर हायजनबर्ग आपल्या गुरूला म्हणजेच नील्स बोर यांना भेटण्यासाठी येतो. नाटकाची सुरवात स्वर्गातील भेटीने होते. त्यात हायजनबर्ग आपल्याला का भेटायला आला होता? याचा विचार बोर पती पत्नी करतात, तर मी कशासाठी बोरला भेटलो? याचा विचार हायजनबर्ग करतो. नाटक पुन्हा पूर्व स्मृतीत जाऊन भेटीची पुनरावृत्ती करते. युद्धाच्या प्रसंगी जर्मनीच्या अणुकार्यक्रमाचा प्रमुख हायजनबर्ग दोस्त राष्ट्रांच्या अणुकार्याक्रमाबद्दल जाणून घ्यायला आपल्या गुरुकडे तर आला नसेल? या सर्वांमागे कारण कोणतेही असो तो आला आणि भेटला. घराबाहेर चर्चा करायला गेलेले हे दोघे पंधरा मिनिटातच परत येतात.

भौतिकशास्त्रज्ञ म्हणून एखाद्याला अणुशक्तीचा व्यावहारिक उपयोग करण्याचा नैतिक अधिकार आहे की नाही? या हायजनबर्गच्या प्रश्नाने बोर भेट स्थगित करून घरी येतात. हिटलरची हुकूमशाही राजवट असताना मानवतेच्या भूमिकेतून विवेक शाबूत ठेऊन निर्णय घ्यावा असे या प्रश्नाचे उत्तर असू शकेल. परंतू आदर्शवाद प्रत्यक्षात उतरवताना तो किती अवघड असतो हे जाणवते. स्वतःच्या देशावर प्रेम करणारा बोर हिटलरच्या ज्युद्वेषाने भरलेल साम्राज्यवादी धोरणामुळे अणुबॉम्ब त्याच्या हाती लागू द्यायचा नाही असे ठरवतो आणि हिटलरच्या अनुकार्यक्रमाला विलंब करण्याच्या उद्देशाने आलेला हायजनबर्ग यांच्यात चर्चा होते. या चर्चेत शास्त्रज्ञांच्या संशोधनामुळे माणूस विश्वाच्या केंद्रस्थानी आल्याचा निष्कर्ष निघतो. असे होत असतानाच मागरिट शास्त्रज्ञांच्या या श्रेयाला धक्का देत म्हणते की, 'विसाव्या शतकातल्या सगळ्या उज्ज्वल वसंतऋतुंचं फलीत काय?, तर शास्त्रज्ञांनी माणसं मारण्याचं कार्यक्षम मशीन तयार केलं.' या आरोपातून दोघा वैज्ञानिकांची सुटका होत नाही. दोघांनी समन्वयाच्या भूमिकेतून माणसाला अन्वस्त्रांच्या संहारापासून दुर ठेवण्याचा प्रयत्न करतात.

समिक्षा

'प्रत्यय' या कोल्हापूरच्या हौशी नाटक कंपनी ची प्रस्तुती असलेल हे नाटक आहे. मायकेल फ्रायनच्या रचनेचा डॉ.शरद ननवरे यांनी अनुवाद केला आहे, तर नाटकाचे दिग्दर्शन डॉ.शरद भुताडिया यांनी केले आहे. नील्स बोरची अत्यंत प्रभावी भूमिका स्वतः डॉ.भुताडिया यांनी केली आहे व हायजनबर्गच्या भूमिकेत सागर तळाशीकर आहेत. नील्स बोर यांची पत्नी मागरिटची भूमिका

दरोडेखोर महिलेला पकडले

पुणे सोलापूर रेल्वे मार्गावरील जिंती रेल्वे स्टेशनवर दरोड्याच्या हेतूने आलेल्या पाच जणांच्या टोळीतील एका दरोडेखोर महिलेला पोलिसांनी पकडले. आरोपी महिला वैशाली लाल्या काळे (वय २४ रा. पोलमवाडी, ता.करमाळा, जि. सोलापूर) हिला अटक करण्यात आली.

दौंड रेल्वे पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षक सुरेश गौड यांनी दिलेल्या माहितीनुसार पुणे - सोलापूर रेल्वे मार्गावर सिग्नलच्या वायर तोडून, रेल्वे गाड्या थांबवून अनेकदा गाडीतील प्रवाशांना मारहाण करून त्यांच्याकडील किंमती ऐवजांची लूट केली जात असे. याची माहिती मिळाल्यानंतर रेल्वे पोलिसांनी पाच पथके तयार करून सापळा रचला. वैशाली लाल्या काळे, झेलम सिकींद्र्या काळे (वय ३५), पांड्या गोरख भोसले हे रेल्वे गाडीवर दरोडा टाकण्याच्या तयारीत असतानाच पोलिसांनी त्यांना पकडण्याचा प्रयत्न केला. पोलिसांना पाहताच ते पळाले आणि त्यांचा पाठलाग केला असता, वैशाली काळे हि महिला सापडली व इतर पळून जाण्यात यशस्वी झाले. या महिलेची महिला पोलिस उपनिरीक्षक एम.एस.कौटिकवार यांनी झडती घेतली असता तिच्याकडे १८ मोबाईल संच, एक सुरी, कुऱ्हाड, वायर तोडण्यासाठी वापरले जाणारे कटर पाच बॅटऱ्या, एक स्क्रू-ड्रायव्हर, एक्सा ब्लेड,२ अडकित्ते, दोन फायटर, पक्कड असा ऐवज जप्त केला.

या पोलिस पथकामध्ये पोलिस निरीक्षक सुरेशसिंग गौड, महिला उपनिरीक्षक एम.एस. कौटिकवारया पोलिसांनी सहभाग घेतला.

दिनांकः १० सावित्राबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संज्ञापन व वृत्तपत्रविद्या विभागाचे प्रायोगिक प्रकाशन * प्रकाशकः डॉ. उज्ज्वला बर्वे (विभाग प्रमुख) *
* विद्यार्थी संपादकः संदीप आखाडे, कल्याणी माणगांवे, सुमित सोनवणे, सम्राट कदम, शिवराज कुंभार, चेतन गिरे *